# कमला कनिष्ठ महाविद्यालयाचे यश


पूजा रेडेकर


अनुष्का कदम


आदिती काटे

कोल्हापूर : कमला कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी १२ वी परीक्षेत चांगली कामगिरी केली. महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल ९८.९५ टक्के लागला. वाणिज्य शाखेचा ९१.८१, तर कला शाखेचा ९६.५२ टक्के निकाल लागला. यात विज्ञान शाखेत अनुष्का सुरेश कदम हिने ८५.१७ टक्के मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. पूजा राजेंद्र रेडेकर हिला ९०.६७ टक्के गुण मिळाले. ती वाणिज्य शाखेत पहिली आली. कला शाखेत आदिती अविनाश काटे हिने ८१ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. या सर्व विद्यार्थिनींना ताराराणी विद्यापीठ संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, सचिव प्राजक्त पाटील, प्राचार्य डॉ. तेजस्विनी बी. मुडेकर यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.

Scanned by CamScanner